# Library & Information Centre

## GIT NEWS

**Pudhari 06-05-2016**

# ‘जीआयटी’तर्फे विद्यार्थ्यांना रोजगार

बेळगाव : प्रतिनिधी

कर्नाटक लॉ सोसायटी संचलित गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाविद्यालयातील विविध विभागातील ७५० विद्यार्थ्यांना देशभरातील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे व चेअरमन यु. एन. कालकुंद्रीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सर्व विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष साडेचार लाख ते दहा लाखांपर्यंत वेतन मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासूवृत्ती वाढविण्याबरोबरच त्यांच्या गुणवत्तेला वाव देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. ऑरा, ॲव्हलांचे यासारखे सांस्कृतिक व अन्य कार्यक्रम सादर करण्यात येतात. यावर्षी जीआयटी महाविद्यालयाला २०१५-१६ सालचा प्रतिष्ठेचा एशियन एज्युकेशन लिडरशिप पुरस्कार देऊन दुबई येथे गौरविण्यात आले. येथील विद्यार्थ्यांना केंब्रीज तसेच अन्य नामांकित महाविद्यालयामार्फत इंग्रजीसाठी विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

नुकतीच जपान येथील आंतरराष्ट्रीय सहकार्य संघटनेच्या सहकार्यातून सीआयआय, बीएफसी यांच्याशी इंडस्ट्री व अभ्यासक्रम या विषयावर सहयोग करार करण्यात आला आहे. २०१५-१६ सालामध्ये जीआयटी महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. व्हीटीयुच्या अभ्यासक्रमाबरोबरच जीआयटी महाविद्यालयाने स्वत:चा अभ्यासक्रमही तयार केला असल्याची माहिती डॉ. ए. एस. देशपांडे यांनी दिली.

**Times of India 06-05-2016**



## New courses at GIT

**Belagavi:** GIT will launch master's courses in industrial engineering and management, and automotive electronics. TNN

**Sakal 06-05-2016**



## जीआयटीच्या ७५० विद्यार्थ्यांची 'कॅम्पस'मध्ये निवड

बेळगाव, ता. ५ : गोगटे तांत्रिक महाविद्यालयाच्या साडेसातशे विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांनी घेतलेल्या कॅम्पस मुलाखतींमध्ये निवड झाली आहे. यासह आंतराष्ट्रीय स्तरावर झालेल्या स्पर्धांमध्येही गोगटेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. देशपांडे म्हणाले, 'जीआयटीमधील उत्कृष्ट शिक्षण आणि येथील प्रतिभावंत विद्यार्थ्यांमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पसंती दिली आहे. कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दरवर्षी साडेचार ते १० लाख रुपयांचे वेतन मिळणार आहे. जीआयटीने जपानच्या आंतरराष्ट्रीय कार्पोरेशन, सीआयआय, बीएफसी यांच्यासोबत ऐतिहासिक सहकार्य करार केले आहेत.

याबरोबरच विद्यार्थ्यांना अधिक प्रशिक्षण देण्यासाठी व्हीजनरी लघु उद्योग मित्र मंडळ बेळगाव शाखेची सुरवात केली आहे. दक्षिण भारतातील ही एकमेव शाखा ठरली आहे. कर्नाटक लॉ सोसायटीने जीआयटीमध्ये इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट व ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रॉनिक्स हे नवे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले आहेत, अशी माहिती प्रा. देशपांडे यांनी दिली. यावेळी कर्नाटक लॉ सोसायटी संस्थेचे सदस्य यू. एन. कालकुंद्रीकर, संजय देशपांडे उपस्थित होते.